शिखर परिषदांना सरकारचे आवाहन

अंतिम वर्षाच्या परीक्षा घेऊ नका!

लोकसत्ता प्रतिनिधी

मुंबई : करोनाचा धोका लक्षात घेता व्यावसायिक आणि अव्यावसायिक अभ्यासक्रमांच्या अंतिम वर्षाच्या परीक्षा न घेण्याच्या भूमिकेवर ठाम असल्याचे राज्य सरकारने शुक्रवारी पुन्हा एकदा न्यायालयात स्पष्ट केले.

त्याचप्रमाणे विद्यापीठातर्फे देण्यात येणारे अंतिम वर्षाचे निकाल ग्राह्य धरून विद्यार्थ्यांना पुढील अभ्यासक्रमासाठी प्रवेश द्यावा, असे आवाहन व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या शिखर संस्थांना करण्यात आल्याचेही महाधिवक्ता आशुतोष कुंभकोणी यांनी न्यायालयाला सांगितले.

राज्य सरकारच्या १९ जूनच्या निर्णयाला पुणेस्थित धनंजय कुलकर्णी या निवृत्त शिक्षकाने ॲड. उदय वारुंजीकर यांच्यामार्फत आव्हान दिले आहे. अधिकार नसतानाही सरकारने निर्णय घेतल्याचा आरोप त्यांनी याचिकेत केला आहे.

मुख्य न्यायमूर्ती दीपांकर दत्ता आणि न्यायमूर्ती अनुजा प्रभुदेसाई यांच्या खंडपीठासमोर शुक्रवारी झालेल्या सुनावणीच्या वेळी राज्य सरकारच्या वतीने महाधिवक्ता आशुतोष कुंभकोणी यांनी सरकार आपल्या भूमिकेवर ठाम असल्याचे सांगत उपरोक्त माहितीही न्यायालयाला दिली. करोनाच्या वाढत्या प्रादुर्भावामुळे 'राज्य आपत्कालीन व्यवस्थापन प्राधिकरणा'ने व्यावसायिक आणि अव्यावसायिक अभ्यासक्रमांच्या अंतिम वर्षाच्या परीक्षा न घेण्याचा निर्णय घेतला. त्याआधारे त्याबाबतचा शासननिर्णय काढण्यात आल्याचे सरकारने आपल्या प्रतिज्ञापत्रात म्हटले आहे. तर परीक्षा घेण्याचे आदेश विद्यापीठांना देणाऱ्या विद्यापीठ अनुदान आयोगाच्या (यूजीसी) निर्णयाला केंद्रीय गृह मंत्रालयाने मंजुरी दिली आहे. त्यामुळे या दोन्हींना प्रतिवादी करण्याची मागणी याचिकाकर्त्यांनी केली.

दरम्यान, परीक्षा घेण्याचे आदेश देणाऱ्या यूजीसीला प्रतिवादी करण्याचे आदेश न्यायालयाने मागील सुनावणीच्या वेळी दिले होते. शुक्रवारच्या सुनावणीत यूजीसीने भूमिका स्पष्ट करण्यासाठी वेळ देण्याची विनंती न्यायालयाकडे केली. न्यायालयानेही ती मान्य केली.

दंत वैद्यकीयच्या विद्यार्थ्यांना दिलासा देण्यास नकार

दंत वैद्यकीयच्या परीक्षा ३ ऑगस्टपासून सुरू होणार असून विद्यार्थ्यांना परीक्षास्थळी पोहोचण्यासाठी विविध सूचना करण्यात आल्या आहेत. मात्र सध्याच्या स्थितीत विद्यार्थी परीक्षा देण्याच्या मनःस्थितीत नाहीत. त्यामुळे या परीक्षा रद्द करण्याची मागणी विद्यार्थ्यांच्या वतीने करण्यात आली. या परीक्षांचे वेळापत्रक अद्याप निश्चित केलेले नाही आणि या परीक्षा ३ सप्टेंबरपूर्वी घेणे शक्य नाही, असे आरोग्य विज्ञान विद्यापीठातर्फे सांगण्यात आले. त्यानंतर न्यायालयाने या प्रकरणी दिलासा देण्यास नकार दिला.

'वृत्तपत्रांतून माहिती प्रसिद्ध करा'

यूजीसीच्या परीक्षा घेण्याच्या निर्णयाला विरोध करणारी याचिका काही विद्यार्थी संघटना आणि विद्यार्थ्यांनी केली आहे. मात्र असे काही विद्यार्थी आहेत, ज्यांना परीक्षा द्यायच्या आहेत. त्यामुळे त्या विद्यार्थ्यांना या याचिकांबाबत माहिती असणे आवश्यक आहे. म्हणूनच याचिकाकर्त्यांनी केलेल्या याचिकेतील मागणी काय आहेत, याबाबतची नोटीस इंग्रजी आणि मराठी वृत्तपत्रांत प्रसिद्ध करावी, असे आदेश न्यायालयाने दिले आहेत.

वैद्यकीय पदव्युत्तरच्या परीक्षा २५ ऑगस्टपासून



सुपरस्पेशालिटी अभ्यासक्रमांसाठी वैद्यकीय पदव्युत्तरच्या अंतिम वर्षाच्या परीक्षा बंधनकारक आहेत. त्यातूनच या विद्यार्थ्यांचे कौशल्य स्पष्ट होते. त्यामुळेच या परीक्षा घेण्याचा निर्णय घेण्यात आला असून त्या २५ ऑगस्टपासून सुरू होतील. पदवीच्या अंतिम परीक्षांबाबतचा निर्णय मात्र अद्याप घेण्यात आलेला नाही, अशी माहिती 'महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठा'तर्फे ॲड. राजशेखर गोविलवकर यांनी न्यायालयाला दिली.

अराजपत्रित पदांची भरती प्रक्रिया राबवण्यास 'एमपीएससी' तयार

राज्य शासनाकडून परवानगी आवश्यक

चिन्मय पाटणकर, लोकसत्ता

पुणे : शासनातील अराजपत्रित पदांच्या भरतीची प्रक्रिया राबवण्यासाठी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून (एमपीएससी) सकारात्मक प्रतिसाद देण्यात आला आहे. आता राज्य शासनाने निर्णय घेऊन भरती प्रक्रिया राबवण्यास परवानगी देणे आवश्यक आहे.

उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील शासनाने महापरीक्षा संकेतस्थळ बंद करण्याचा निर्णय घेतला आहे. या संकेतस्थळाला पर्यायी व्यवस्था निर्माण करण्यासाठी निविदा प्रक्रिया राबवण्यात आली आहे. ही प्रक्रिया अद्याप पूर्ण झालेली नाही. मात्र अराजपत्रित पदांची भरती प्रक्रिया अन्य कोणत्याही पद्धतीने न राबवता एमपीएससीकडे सोपवण्याची राज्यभरातील उमेदवारांची मागणी आहे.

दरम्यान, काही दिवसांपूर्वी राज्य शासनाकडून सर्व शासकीय कार्यालयातील अराजपत्रित पदांच्या भरती प्रक्रिया राबवण्याबाबत एमपीएससीकडे प्रस्ताव देण्यात आला होता. त्याला एमपीएससीकडून सकारात्मक प्रतिसाद देण्यात आला असून, अराजपत्रित पदांची भरती प्रक्रिया राबवण्यास तयार असल्याचे पत्राद्वारे १४ जुलै रोजी कळवण्यात आले आहे.

गेल्या पाच वर्षांत निर्णयच नाही...

एमपीएससीकडून २०१५ मध्येही अराजपत्रित पदांची आणि सार्वजनिक बांधकाम विभाग, जलसंपदा विभागातील कनिष्ठ अभियंता या पदांची भरती प्रक्रिया राबवण्याबाबत तयारी असल्याचे शासनाला कळवण्यात आले होते. त्यानंतरच्या पाच वर्षांत शासनाच्या स्तरावर कोणताही निर्णय न होता खासगी संस्थांच्या माध्यमातून भरती प्रक्रिया राबवण्यात आली. त्यामुळे आता तरी राज्य शासन भरती प्रक्रियेची जबाबदारी एमपीएससीकडे सोपवणार का, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

"सर्व संवर्गांच्या पदभरतीबाबत शासनाकडून प्राप्त झालेल्या प्रस्तावास आयोगाने सकारात्मक प्रतिसाद दिला आहे. आता या पुढील कार्यवाही शासन स्तरावर होणे अपेक्षित आहे. या संदर्भातील भरती प्रक्रिया राबवण्याची आयोगाची तयारी आहे.

- सुनील अवताडे, सहसचिव, परीक्षा पूर्व आणि माहिती तंत्रज्ञान विभाग, महाराष्ट्र लोकसेवा आयोग

'करोना योद्ध्यां'चा कायम सेवेसाठी लढा

६५० कंत्राटी डॉक्टरांचा आंदोलनाचा इशारा

संदीप आचार्य, लोकसत्ता

मुंबई : करोनाविरोधातील लढ्यात आघाडीवर असलेल्या राज्यातील १८ शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांतील ६५० साहाय्यक प्राध्यापकांना पाच वर्षांनंतरही सेवेत कायम न केल्याने त्यांनी नाराजी व्यक्त केली आहे. आपली मागणी पूर्ण न झाल्यास आंदोलनाचा इशारा त्यांनी दिला आहे.

शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात अध्यापनाबरोबरच रुग्ण सेवा देणाऱ्या या ६५० साहाय्यक प्राध्यापकांना त्यांचे मार्च महिन्यातील वेतनही अर्धेच देण्यात आले असून, गुलामाचे जीवन आम्ही जगत असल्याचे या डॉक्टरांचे म्हणणे आहे. सर्वोच्च न्यायालयाने नुकत्याच दिलेल्या निकालात 'समान काम, समान वेतन' असा निर्णयही दिला. मात्र महाराष्ट्रासारख्या प्रगत व पुरोगामी राज्यातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात गेल्या पाच वर्षांपासून आम्ही वैद्यकीय प्राध्यापक कंत्राटी सेवेच्या नावाखाली गुलामाचे जीवन जगत असल्याचे अस्वस्थ मत 'महाराष्ट्र राज्य वैद्यकीय शिक्षक संघटने'चे अध्यक्ष डॉ. सचिन मुळकुटकर यांनी व्यक्त केले.

राज्यातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांत पुरेसे अध्यापक व प्राध्यापक नाहीत. ३,१२४ मंजूर पदांपैकी केवळ १,८४० प्राध्यापकांची पदे भरण्यात आली आहेत, तर ७०१ हंगामी आणि ५८३ कंत्राटी प्राध्यापकांच्या मदतीने शिक्षणाचा गाडा हाकला जात आहे. यातील कंत्राटी साहाय्यक प्राध्यापकांना सातवा वेतन आयोग लागू नाही, वेतनवाढ नाही, भत्ते व सुट्ट्या नाहीत तसेच त्यांनी केलेली आजपर्यंतची सेवा अनुभव म्हणून धरण्यासही सरकारी 'बाबू' तयार नाहीत. १२० दिवसांच्या कामानंतर सेवेत खंड देऊन त्यांना कामावर घेतले जाते. सरकारने याबाबत सारेच नियम धाब्यावर बसवले असून सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार 'समान काम, समान वेतन' हा नियमही या प्राध्यापक डॉक्टरांना लागू नाही. मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी आम्हाला सेवेत कायम करून न्याय द्यावा, अशी मागणी जे जे रुग्णालय व ग्रँट मेडिकल कॉलेजमध्ये नेत्र विभागात साहाय्यक प्राध्यापक म्हणून काम करणाऱ्या डॉ. सुमीत तात्याराव लहाने यांनी केली आहे.

मागणी काय?



- शासनाने यापूर्वी २००९ मध्ये ३९९ व २०१६ मध्ये १९२ अध्यापकांना सेवेत कायम केले आहे. आम्ही पदव्युत्तर वैद्यकीय शिक्षण घेऊन शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात गेली अनेक वर्षे अध्यापन आणि रुग्णोपचार करत असून, आम्हाला आता सेवेत कायम केले जावे एवढीच आमची मागणी आहे, असे डॉ. सचिन मुळकुटकर यांनी सांगितले.
- राज्याच्या वैद्यकीय शिक्षण संचालनालयानेही करोना काळात या सर्व बाबींचा आढावा घेऊन या कंत्राटी प्राध्यापकांना सेवेत कायम करण्याची शिफारस ११ जून रोजी सरकारला केली आहे.
- आता या करोनायोद्ध्यांचा सन्मान केवळ अभिनंदन पत्राच्या बोळवणीने होणार की सेवेत कायम करून केला जाणार, यावर या साहाय्यक प्राध्यापकांच्या आंदोलनाची दिशा ठरणार आहे.

चक्रीवादळग्रस्तांना लवकरच पूर्ण मदत

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

मुंबई : निसर्ग चक्रीवादळामुळे बाधित कुटुंबीयांना वाटप करण्यात येत असलेल्या मदतीबाबत समाधान व्यक्त करतानाच कोकणातील एकही नुकसानग्रस्त कुटुंब मदतीपासून वंचित राहणार नाही याची खबरदारी घ्या तसेच मदतीचे उर्वरित कामही लवकरात लवकर पूर्ण करण्याचे आदेश मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी शुक्रवारी संबंधित जिल्हाधिकाऱ्यांना दिले.

जून महिन्याच्या पहिल्या आठवड्यात आलेल्या निसर्ग चक्रीवादळात कोकणाचे तब्बल सहा हजार कोटींचे नुकसान झाले आहे. त्यातही रायगड आणि रत्नागिरी जिल्ह्याला सर्वाधिक फटका बसला असून घरांचे, फळबागांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. या वादळामुळे महावितरणच्या वीज वितरण व्यवस्थेचे सुमारे १५० कोटींचे नुकसान झाल्याचा अहवाल सरकारने तयार केला आहे. मुख्यमंत्र्यांनी दूरचित्र संवादाच्या माध्यमातून या मदतवाटपाचा आढावा घेतला. त्या वेळी मुख्य सचिव संजय कुमार, मुख्यमंत्र्यांचे अप्पर मुख्य सचिव आशीषकुमार सिंह, प्रधान सचिव विकास खारगे, मदत व पुनर्वसन विभागाचे सचिव किशोरराजे निंबाळकर, कोकण विभागीय आयुक्त लोकेशचंद्र व संबंधित जिल्ह्यांचे जिल्हाधिकारी उपस्थित होते.

"नुकसानग्रस्तांना उर्वरित मदतही तात्काळ देण्यात यावी यासाठी प्रशासनाने युद्धपातळीवर काम करावे. कुठलाही नुकसानग्रस्त मदतीपासून वंचित राहाणार नाही याची खबरदारी प्रशासनाने घ्यावी. पावसामुळे रस्ते, वीजपुरवठा मोबाइल संपर्क व्यवस्था पूर्ववत करण्यात अडचणी येत असल्या तरी यामधील प्रलंबित कामे ही लवकरात लवकर पूर्ण करा.

- मुख्यमंत्री उद्धव ठाकरे

मदत कशी?

वादळग्रस्तांच्या मदतीसाठी केंद्र सरकारकडे राष्ट्रीय आपत्ती निधीतून किमान ११०० कोटींची मदत मागण्यात येणार आहे. नुकसानग्रस्त लोकांना तातडीने मदत देण्यासाठी सरकारने रायगड जिल्ह्यासाठी ३७२ कोटी ९७ लाख, रत्नागिरीसाठी ११६ कोटी ७८ लाख आणि सिंधुदुर्गसाठी ३७ कोटी १९ लाख असे ४९० कोटी १३ लाख रुपयांचा निधी जिल्हाधिकाऱ्यांकडे पाठविला आहे.

मुंबई विद्यापीठाची प्रवेशपूर्व ऑनलाईन नावनोंदणी प्रक्रिया सुरू

मुंबई : मुंबई विद्यापीठाशी सलंग्नित महाविद्यालये आणि शिक्षणसंस्थामधील प्रथम वर्ष पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी प्रवेशपूर्व ऑनलाईन नावनोंदणी प्रक्रिया सुरू झाली आहे. पदवी अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षाला प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांनी मुंबई विद्यापीठाच्या प्रणालीवर प्रवेशपूर्व नोंदणी करणे करणे बंधनकारक आहे.

विद्यापीठाच्या संकेतस्थळावर देण्यात आलेल्या Mumbai University Pre Admission online Registration २०२०-२१ या पर्यायावर क्लिक करून नोंदणी करता येईल. प्रवेश प्रक्रियेचे सविस्तर वेळापत्रक स्वतंत्रपणे जाहीर करण्यात येणार आहे.

पर्यावरण विभागाच्या प्रधान सचिवपदी मनीषा म्हैसकर

मुंबई : राजशिष्टाचार विभागाच्या प्रधान सचिव मनीषा पाटणकर-म्हैसकर यांची पर्यावरण विभागाच्या प्रधान सचिवपदी नियुक्ती करण्यात आली आहे. मुंबई महापालिकेचे सहआयुक्त आशुतोष सलील यांची पर्यटन विकास महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालकपदी, तर श्रीकृष्णनाथ पांचाळ यांची यवतमाळ जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारीपदी नियुक्ती करण्यात आली आहे.

एम इ पी इन्फ्रास्ट्रक्चर डेवलपर्स लिमिटेड
कॉर्पोरेट आयडेंटीफीकेशन नंबर (सीआयएन): L45200MH2002PLC136779
रजिस्टर्ड ऑफीस: ए. ४१२, बूमरँग, चांदिवली फार्म रोड, चांदिवली स्टुडिओ जवळ, अंधेरी (पूर्व), मुंबई ४०० ०७२
इ. मेल: investorrelations@mepinfra.com वेबसाईट: www.mepinfra.com
टेलिफोन: ९१ २२ ६१२०४८०० फॅक्स: ९१ २२ ६१२०४८०४

याद्वारे नोटीस दिली जाते की सेबी (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स ॲण्ड डिस्क्लोझर रिक्वायरमेंट्स) रेग्युलेशन्स २०१५ च्या नियम ४७ नुसार कंपनीच्या संचालक मंडळाची बैठक जी गुरुवार दिनांक २३ जुलै, २०२० रोजी आयोजित करण्यात आली होती ती आता गुरुवार दिनांक ३० जुलै, २०२० रोजी पुनर्निर्योजीत केली असून त्यात कंपनीच्या ३१ मार्च, २०२० रोजी संपलेल्या चौथ्या त्रैमासिकाकरीता आणि वर्षाकरीता एकल आणि एकत्रित अशा दोन्ही प्रकारच्या लेखापरिक्षित वित्तीय अहवालाचा विचार करुन, मान्यता देऊन नोंदवण्यात येणार आहे .
सदर नोटीस कंपनीच्या www.mepinfra.com या वेबसाइटवर आणि स्टॉक एक्स्चेंजची वेबसाइट www.bseindia.com आणि www.nseindia.com वरही उपलब्ध असेल.

संचालकमंडळ करिता
एम इ पी इन्फ्रास्ट्रक्चर डेवलपर्स लिमिटेड
Sd/-
हर्षद पुसाळकर
कंपनी सेक्रेटरी

ठिकाण : मुंबई
दिनांक: १७ जुलै, २०२०

ICICI Lombard
Nibhaye Vaade

आयसीआयसीआय लोम्बार्ड जनरल इंश्युरन्स कंपनी लिमिटेड
(CIN: L67200MH2000PLC129408)
नोंदणीकृत कार्यालय: आयसीआयसीआय लोम्बार्ड हाऊस, ४१४, वीर सावरकर मार्ग, सिध्दिविनायक मंदिराजवळ, प्रभादेवी, मुंबई ४०० ०२५
दू.: ०२२-६१९६१९०० फॅक्स: ०२२-६१९६१३२३
संकेतस्थळ: www.icicilombard.com ई-मेल: investors@icicilombard.com

व्हीडीयो कॉन्फरन्सींग (''व्हीसी'')/अन्य ऑडीयो व्हीज्युअल साधनांव्दारे (''ओएव्हीएम'') होणाऱ्या वीसाव्या सर्वसाधारण सभेची सूचना

प्रिय सभासद,:

१. **याव्दारे सूचना देण्यात येते की, आयसीआयसीआय लोम्बार्ड जनरल इंश्युरन्स कंपनी लिमिटेडच्या (''कंपनी'') सभासदांची वीसावी वार्षिक सर्वसाधारण सभा गुरुवार, १३ ऑगस्ट, २०२० रोजी दु. २.०० वाजता (भाप्रवे) व्हीडीयो कॉन्फरन्सींग (''व्हीसी'')/अन्य ऑडीयो व्हीज्युअल साधनांव्दारे (''ओएव्हीएम''),** एजीएमच्या सूचनेमध्ये नमूद असलेले कामकाज पार पाडण्याकरिता संपन्न होईल.
२. सध्याच्या कोव्हीड-१९ च्या साथीमुळे, कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालयाद्वारे (''एमसीए'') वितरीत, ८ एप्रिल, २०२०, १३ एप्रिल, २०२० दिनांकित परिपत्रकासह वाचित ५ मे, २०२० दिनांकित परिपत्रकानुसार (सामुदायीकरित्या 'एमसीए परिपत्रक' म्हणून संबोधित) सार्वजनिक स्थळावर सभासदांच्या प्रत्यक्ष उपस्थिती विना व्हीसी/ओएव्हीएमद्वारे वार्षिक सर्वसाधारण सभा आयोजित करण्याची परवानगी देण्यात आली आहे. तदनुसार, एमसीए परिपत्रक आणि कंपनी कायदा, २०१३ (कायदा) आणि सेबी (सुचिबध्दता बंधन आणि प्रकटन आवश्यकता) विनियम, २०१५ च्या अनुपालनामध्ये, व्हीसी/ओएव्हीएम द्वारे कंपनीच्या सभासदांची वार्षिक सर्वसाधारण सभा होईल.
३. उपरोक्त एमसीए परिपत्रक आणि सेबीच्या १२ मे, २०२० दिनांकित परिपत्रकानुसार, ज्या सभासदांनी कंपनी/त्यांचे निबंधक आणि हस्तांतरण एजंट (''आरटीए'') किंवा संबंधित डिपॉजिटरीजकडे आपले ई-मेल आयडी नोंदविले आहेत त्या सभासदांना कंपनीद्वारे एजीएम सूचना आणि वित्तीय वर्ष २०२० चा वार्षिक अहवाल इलेक्ट्रॉनिक माध्यमाद्वारे पाठविण्यात येईल. एजीएमची सूचना आणि वित्तीय वर्ष २०२० चा वार्षिक अहवाल कंपनीच्या संकेतस्थळ www.icicilombard.com, स्टॉक एक्सचेंजेस अर्थात बीएसई लिमिटेडचे संकेतस्थळ www.bseindia.com आणि नॅशनल स्टॉक एक्सचेंज ऑफ इंडियाचे संकेतस्थळ www.nseindia.com वर आणि एनएसडीएल यांच्या संकेतस्थळ www.evoting.nsdl.com वरही उपलब्ध होईल.
४. **नोंदणीची पध्दत /ईमेल पत्त्यांचे अद्ययावतीकरण :**
   - भौतिक प्रारूपामध्ये भागधारक सभासदांनी त्यांचे इमेल पत्ते कंपनीकडे नोंदविण्यासाठी/अद्ययावत करण्यासाठी, कृपया कंपनीच्या आरटीए अर्थात केफिन टेक्नॉलॉजिस प्रायव्हेट लिमिटेड यांच्या einward.ris@kfintech.com येथे फोलीओ क्र., भागधारकाचे नाव, भाग प्रमाणपत्राची स्कॅन्ड प्रत (पुढील आणि मागील), पॅन कार्डची स्व-साक्षांकीत स्कॅन्ड प्रत, आधार कार्डची स्व-साक्षांकीत प्रतीसोबत लेखी विनंतीकरून अद्ययावत करावेत.
   - डीमॅटराईज्ड प्रारूपामध्ये भागधारक सभासदांनी कृपया त्यांचे इमेल पत्ते, ज्यांच्याकडे त्यांचे डिमॅट खाते परिरक्षीत आहे त्या संबंधीत डीपॉजिटरी पार्टीसीपंटसकडे नोंदणी /अद्ययावत करावेत.
   - कंपनीने https://www.icicilombard.com/investor-relations/shareholderform येथे एक्सेसद्वारे कंपनीचा वार्षिक अहवाल आणि एजीएमची नोटीस (रिमोट ई-व्होटींग सूचना समाविष्ट) प्राप्त करण्याच्या मर्यादित कारणासाठी प्रक्रिया सक्षम केली आहे. कंपनीचा वार्षिक अहवाल आणि एजीएमची सूचना प्राप्त करण्यासाठी सभासदांनी कृपया ईमेल पत्ता आणि मोबाईल क्र. अधिकृतीच्या मार्गदर्शनानुसार प्रक्रिएचे पालन करावे. कोणतीही शंका असल्यास, सभासदांनी investors@icicilombard.com येथे लहून विचारावे.
५. एजीएम सूचनेमध्ये नमूद सर्व ठरावांवर सर्व सभासदांना त्यांचे मत नोंदविण्यासाठी कंपनीने ई-व्होटींग सुविधा (रिमोट ई-व्होटींग) उपलब्ध केली आहे. याच्या अतिरिक्त, एजीएम दरम्यान कंपनी ई-व्होटींग प्रणालीद्वारे मतदानाची सुविधा उपलब्ध करीत आहे (ई-व्होटींग). रिमोट ई-व्होटींग प्रक्रियेचा तपशिल एजीएम सूचनेमध्ये देण्यात येत आहे.
६. वित्तीय वर्ष २०२० च्या वार्षिक अहवालासह एजीएमची सूचना अमलात असलेल्या कायद्यानुसार नियमित कालावधीमध्ये सभासदांना त्यांच्या नोंदणीकृत ईमेल पत्त्यावर पाठविण्यात येईल.

सदर सूचना कंपनीच्या सर्व सभासदांच्या माहितीसाठी आणि लाभार्थ आणि एमसीए परिपत्रक आणि सेबी परिपत्रकाच्या अनुपालनामध्ये वितरीत करण्यात आली आहे.

आयसीआयसीआय लोम्बार्ड जनरल इंश्युरन्स कंपनी लिमिटेड करिता
स्वाक्षरी/-
विकास मेहरा
कंपनी सचिव
ACS १२११७

मुंबई
१७ जुलै, २०२०

आयसीआयसीआय लोम्बार्ड जनरल इंश्युरन्स आयसीआयसीआय लोम्बार्ड जनरल इंश्युरन्स कंपनी लिमिटेड. उपरोक्त प्रदर्शित आयसीआयसीआय ट्रेड लोगो आयसीआयसीआय बँकेच्या मालकीचा आहे आणि अनुज्ञप्ती अंतर्गत आयसीआयसीआय लोम्बार्ड जनरल इंश्युरन्स कंपनी लिमिटेड द्वारे वापरण्यात आला आहे आणि लोम्बार्ड ट्रेड लोगो आयसीआयसीआय लोम्बार्ड जनरल इंश्युरन्स कंपनी लिमिटेडच्या मालकीचा आहे. नोंदणीकृत कार्यालय : आयसीआयसीआय लोम्बार्ड हाऊस, ४१४, वीर सावरकर मार्ग, सिध्दिविनायक मंदिराजवळ, प्रभादेवी, मुंबई - ४०० ०२५. आयआरडीए नोंद. क्र. ११५, टोल मुक्त क्र. १८०० २६६६. फॅक्स क्र. : ०२२-६१९६१३२३. CIN : L67200MH2000PLC129408. UIN 9934 संकेतस्थळ : www.icicilombard.com. ई-मेल : customersupport@icicilombard.com.

'एसटी'तील रोजंदारीवरील चार हजार कर्मचारी बेरोजगार

लोकसत्ता प्रतिनिधी

मुंबई : एसटी महामंडळाचे आर्थिक गाडे रूळावर न आल्याने रोजंदारीवरील चालक-वाहकांची सेवा तात्पुरती स्थगित करण्याचा निर्णय शुक्रवारी घेण्यात आला. रोजंदारीवरील कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षणही थांबविण्यात आले आहे.

यामध्ये चालक-वाहकांबरोबरच सहाय्यक, लिपिक-टंकलेखक इत्यादींचा समावेश आहे. ही संख्या चार हजारापर्यंत असल्याचा दावा कामगार संघटना करत आहे.

टाळेबंदी सुरू झाल्यापासून एसटीची सेवा फक्त मुंबई महानगर क्षेत्रात अत्यावश्यक कर्मचाऱ्यांसाठी सुरू आहे. जूनमध्ये तालुका स्तरावर एसटी सेवा सुरू केली गेली. परंतु करोनाच्या धास्तीमुळे प्रवाशांनी प्रवासाकडे पाठ फिरवली. परिणामी, महामंडळाला मोठे नुकसान सोसावे लागत आहे. उत्पन्न कमी आणि खर्च जास्त असल्याने एसटीने कामगार कपात करीत रोजंदारीवरील कर्मचाऱ्यांची सेवा तात्पुरती स्थगित करण्याचा निर्णय घेतला आहे.

भविष्यात आवश्यकता भासल्यास त्यांना ज्येष्ठतेनुसार पुन्हा सेवेत सामावून घेण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले.

"रोजंदारीवरील तीन ते चार हजार कर्मचाऱ्यांची सेवा तात्पुरती स्थगित करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. महामंडळाला उत्पन्न नसल्याने हे पाऊल उचलण्यात आले आहे.

- शेखर चन्ने, व्यवस्थापकीय संचालक, एसटी महामंडळ

'एअर इंडिया'विरोधात कंत्राटी कामगारांची न्यायालयात धाव

मुंबई : टाळेबंदीचा फटका बसलेल्या 'एअर इंडिया'च्या २५० कंत्राटी कर्मचाऱ्यांनी उच्च न्यायालयात धाव घेत त्यांना काम उलपब्ध करण्याचे आदेश कंपनीला द्यावेत, अशी मागणी केली आहे. न्यायालयानेही त्यांच्या याचिकेची दखल घेत एअर इंडियाला नोटीस बजावली आहे.

'एअर इंडिया कामगार संघ' या संघटनेने या कामगारांच्यावतीने याचिका केली आहे. न्यायमूर्ती रमेश धानुका आणि न्यायमूर्ती व्ही. जी. बिश्ट यांच्या खंडपीठासमोर शुक्रवारी या याचिकेवर सुनावणी झाली. त्या वेळी न्यायालयाने कंपनीला नोटीस बजावत याचिकेवर उत्तर दाखल करण्याचे आदेश दिले आहेत.

टाळेबंदीनंतर सेवा सुरू झाल्यानंतर या कामगारांना बोलावण्यात आले नाही. त्यामुळे त्यांच्यावर बेरोजगार होण्याची वेळ आली आहे.

फडणवीस-शहा यांच्यात साखरप्रश्नी चर्चा

महाविकास आघाडी सरकार अस्थिर करण्याचा विचार नाही - फडणवीस

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

नवी दिल्ली : राज्यातील साखर उद्योगाला केंद्राने आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी विधानसभेतील विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांनी शुक्रवारी दिल्लीत केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची भेट घेऊन केली. तसेच रात्री उशीरा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेऊन त्यांना राज्यातील करोनाच्या स्थितीची माहिती दिल्याचे फडणवीस यांनी सांगितले.

केंद्रीय गृहमंत्र्यांच्या बैठकीत फक्त साखरेच्या मुद्द्यावर चर्चा केली. या भेटीत कोणताही राजकीय अजेंडा नव्हता. राज्यातील महाविकास आघाडी सरकार अस्थिर करण्याचा कोणताही विचार नाही, असेही



फडणवीस म्हणाले.

केंद्रीय स्तरावरील भाजपच्या नियुक्त्यांसदर्भात फडणवीस म्हणाले की, पक्षाची नवी केंद्रीय कार्यकारिणी अजून तयार झालेली नाही. कार्यकारिणीच्या नियुक्त्या झाल्यानंतर पक्षाच्या संसदीय मंडळाच्या नियुक्त्या होतील. संसदीय मंडळाचे सदस्य कोणाला बनवायचे याचा निर्णय पक्षाध्यक्ष घेतील, असे फडणवीस यांनी सांगितले. अरुण जेटली आणि सुषमा स्वराज यांच्या निधनानंतर संसदीय मंडळातील रिक्त झालेल्या दोन्ही जागांवर कोणाचीही नियुक्ती करण्यात आलेली नाही.

शेतकऱ्यांना 'एफआरपी' मिळावा, साखर कारखान्यांच्या कर्जाची फेररचना व्हावी, अल्पमुदतीच्या कर्जाची व्यवस्था केली जावी, तसेच इथेनॉलच्या धोरणाचा विस्तार केला जावा, आदी मुद्द्यांवर दोन तास झालेल्या बैठकीत अमित शहा यांच्याशी सविस्तर चर्चा करण्यात आली. बैठकीला माजी मंत्री हर्षवर्धन पाटील, खासदार रणजीतसिंह नाईक निंबाळकर, आमदार जयकुमार गोरे, धनंजय महाडिक, विनय कोरे, पृथ्वीराज देशमुख आदी उपस्थित होते. या शिष्टमंडळाने केंद्रीय कृषिमंत्री नरेंद्र तोमर, तसेच रामविलास पासवान यांचीही भेट घेतली.

मल्टी कमॉडिटी एक्स्चेंज क्लिअरींग कॉर्पोरेशन लिमिटेड
नोंदणीकृत कार्यालय: एक्स्चेंज स्क्वेअर, सुरेन रोड, चकाला, अंधेरी (पूर्व), मुंबई - ४०० ०९३.
सीआयएन: U74999MH2008PLC185349;
ईमेल: ig-mcxccl@mcxccl.com
संकेतस्थळ: https://www.mcxccl.com

सूचना

सिक्युरिटीज् कॉन्ट्रॅक्टस् (रेग्यूलेशन) (स्टॉक एक्स्चेंजेस अँड क्लिअरींग कॉर्पोरेशन्स) रेग्युलेशन्स, २०१८, च्या नियम ३३ आणि सेबी (लिस्टींग ऑब्लीगेशन्स अँड डिस्क्लोजर रिक्वायरमेंट्स) रेग्युलेशन्स, २०१५, च्या नियम ४७ च्या अनुरोधाने सूचित करण्यात येते की कंपनीच्या संचालक मंडळाची बैठक **शनिवार, दिनांक २५ जुलै २०२० रोजी मुंबई** येथे, *इतर विषयांबरोबर*, कंपनीच्या ३० जून २०२० रोजी संपलेल्या तिमाहीकरीता अलेखापरीक्षित वित्तीय निष्कर्ष विचारात घेणे व मंजूर करणे यासाठी घेण्यात येणार आहे.

उल्लेखित सूचना, कंपनीचे संकेतस्थळ **https://www.mcxccl.com/disclosures/announcement** वर उपलब्ध आहे.

मल्टी कमॉडिटी एक्स्चेंज क्लिअरींग कॉर्पोरेशन लिमिटेड करीता
मंदार कुलकर्णी
कंपनी सचिव

ठिकाण: मुंबई
दिनांक: जुलै १७, २०२०

रविवार १९.०७.२०२० रोजी मेगाब्लॉक

मध्य रेल्वेच्या उपनगरीय विभागांमध्ये विविध अभियांत्रिकी आणि देखभाल कामे करण्याकरिता रविवार दिनांक १९.०७.२०२० रोजी मेगाब्लॉक घेण्यात येईल.

मुख्य मार्ग

ठाणे-कल्याण अप आणि डाऊन जलद मार्गावर सकाळी १०.०० ते दुपारी ३.०० वाजेपर्यंत

- छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथून सकाळी ८.५५ ते दुपारी २.१७ ह्या दरम्यान सुटणाऱ्या डाऊन जलद विशेष सेवा ठाणे आणि कल्याण दरम्यान डाऊन धिम्या मार्गावर वळविण्यात येतील आणि वेळापत्रकानुसार त्यांच्या निर्धारित स्थानकांवर थांबतील.
- कल्याण येथूनस काळी ९.४७ ते दुपारी २.४७ ह्या दरम्यान सुटणाऱ्या विशेष अप जलद सेवा कल्याण ते ठाणे ह्या दरम्यान अप धिम्या मार्गावर वळविण्यात येतील आणि वेळापत्रकानुसार त्यांच्या निर्धारित स्थानकांवर थांबतील व पुढे ठाणे येथे अप जलद मार्गावर व